**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**
**जनसंपर्क विभाग**

---

# कु. आकांक्षा असनारेचा कुलगुरूंचे हस्ते सत्कार

अमरावती.

राज्यस्तरीय युवा सांसद स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकाविणारी डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावतीची विद्यार्थीनी कु. आकांक्षा असनारे हिने दिल्ली स्थित विज्ञान भवनात झालेल्या युवा संसद कार्यक्रमामध्ये थेट माननीय पंतप्रधान ना. नरेंद्र मोदी यांना युवकांच्या स्थितीबाबत विविध प्रश्न विचारले. प्रश्नाचे ना. नरेंद्र मोदी यांनी समर्पक उत्तरे दिलीत.

कु. आकांक्षा असनारे हिची दिल्ली स्थित विज्ञान भवनात झालेल्या कार्यक्रमासाठी निवड झाल्याबद्दल कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी तिचा पुस्तक देवून सत्कार केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. दिनेश सातंगे, रा.से.यो. प्रभारी संचालक डॉ. राजेश बुरंगे उपस्थित होते.

कु. आकांक्षाच्या या गौरवास्पद कामगिरीबद्दल विद्यापीठाच्यावतीने प्रभारी कुलसचिव डॉ. हेमंत देशमुख, शैक्षणिक व प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०२/०३/२०१९.
दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी